बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
विपणन तथा प्रचार विभाग
Marketing Publicity Department
प्रधान कार्यालय : लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5
Head office: Lokmangal,1501, Shivajinagar, Pune-5
टेलीफोन/TELE : 020-25614285-324
cmmktg@mahabank.co.in; media@mahabank.co.in;
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
स्वच्छता अभियान की सफलता हेतु हम प्रतिबद्ध हैं

**प्रसिद्धीसाठी**

# बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे संविधान दिवस आयोजित

पुणे : 26 नोव्हेंबर 2019: बँक ऑफ महाराष्ट्राच्या पुणे स्थित मुख्यालयी आज संविधान दिवस आयोजित करण्यात आला. बँकेद्वारे कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये जागरूकता येण्यासाठी श्री ए. एस. राजीव व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील शाखांमध्ये सातत्यपूर्ण विविध आणि आवश्यक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून संविधान दिवस आयोजित केला गेला. लोकमंगल येथे आयोजित या कार्यक्रमामध्ये कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत यांनी इंग्रजीमध्ये तर कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा यांनी हिन्दीमध्ये मुख्यालयाच्या सर्व कर्मचारी-अधिकाऱ्यांना आणि व्हिडियो कान्फरन्सिंगच्या माध्मातून बँकेच्या सर्व अंचल कार्यालयाच्या कर्मचारी-अधिकाऱ्यांना भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे पठण करविले. कार्यक्रमाचे सूत्र-संचालन सरव्यवस्थापक श्री एम. जी. महाबळेश्वरकर यांनी केले.

यावेळी बोलताना कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा यांनी घटना निर्मितीचा इतिहास सांगत नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये विषद केली. कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत यांनी उपस्थितांना सांगितले की आपण सर्व नागरिक हेच घटनेचे रक्षक असल्याने घटनेमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे आपण आपली कर्तव्ये पूर्ण केली पाहिजेत. त्यांनी नागरिकांच्या आणि खासकरून बँकिंग क्षेत्रातील बंधूंच्या कृतीशील राष्ट्र उभारणी कार्याच्या भूमिकेबाबत जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले.
भारतीय संविधानाच्या संस्थापकांच्या योगदानाचे स्मरण करणे आणि सन्मान करण्यासाठी भारत सरकारच्या वित्त विभागाने देशभरातील सर्व संस्था/ सरकारी कार्यालय आणि इतर प्रतिष्ठानांमध्ये भारतीय संविधानात नोंद केलेल्या निहित मूलभूत कर्तव्यांसाहित नागरिकांच्या कर्तव्यांवर आधारित एक जागरूकता अभियानाचा प्रारंभ करणे आणि संविधान दिवसाचे आयोजन करणे यासाठी सूचना केल्या आहेत. दिनांक 26 नोव्हेंबर पासून या अभियानाचा प्रारंभ होवून एका वर्षापर्यंत हे अभियान चालवण्याची घोषणा भारत सरकारद्वारे केली आहे आणि बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे देखील वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. याचा प्रारंभ भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे पठणाने आज झाला आहे.

बँकेच्या विविध अंचल आणि शाखांद्वारे 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिवस साजरा करण्याबरोबरच दिनांक 14 मार्च 2020 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पर्यन्त बँकेद्वारा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे, ज्या अंतर्गत संविधान प्रस्तावनाचे सार्वजनिक स्वरूपामध्ये वाचन करणे, सेमिनार आयोजन करणे आणि स्व-सहायता गट तसेच युवकांच्या क्लबमधील बैठका, ग्रामपंचायतांच्या बैठकांमध्ये भारत सरकारच्या विविध प्रमुख योजनांच्या रिपोर्ट कार्डचे सार्वजनिक स्वरुपातील वाचन सामील आहे.

बँक अभियान कालावधीतील प्रत्येक महिन्यात संविधानातील निहित मूळ कर्तव्यांमधील प्रत्येक महिन्यात एका कर्तव्यास अंमलात आणेल आणि त्यानुसार कार्य योजनेची अंमलबजावणी करेल. बँकेद्वारा बँकेची वेबसाईट आणि विविध सोशल मीडिया फ्लॅटफॉर्मवर लोगो, ई-पोस्टर आणि लघु चित्रपट आदीच्या माध्यमातून जागरूकता कार्यक्रमाचे व्यापक प्रचार-प्रसार केले जाईल.


बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
DEPARTMENT OF JUSTICE
26 NOVEMBER, 2019
संविधान दिवस और मूल कर्तव्य
CONSTITUTION DAY & CITIZENS' DUTIES


बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
न्याय विभाग
DEPARTMENT OF JUSTICE
26 NOVEMBER, 2019


न्याय विभाग
DEPARTMENT OF JUSTICE
26 NOVEMBER, 2019
संविधान दिवस और मूल कर्तव्य
CONSTITUTION DAY & CITIZENS' DUTIES